**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः गणेश सुर्यकांत मोहिते,

वयः२६ वर्षे, व्यवसायः सलुन,

राहणारः पाले बुदुर्क कोलाड, ता.रोहा, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. माझे घरी मी व माझे आई वडील व बहीण राहतात. सन २०१७ पासून पुढे तीन वर्ष मी सुर्दशन कंपनी मध्ये नोकरी करीत होतो. सन २०१७ मध्ये मी देवेश लोखंडे याचे कडुन जुना मोबाईल फोन विकत घेतला होता. त्यावेळी माझा मित्र दिपक निळगुणकर यांने देखील देवेश लोखंडे कडुन मोबाईल फोन विकत घेतला होता. त्यानंतर काही दिवसांनी मला व दिपकला पोलीसांनी पोलीस स्टेशन, कोलाड येथे बोलावले. त्यावेळी देवेश लोखंडेने आम्हाला विकलेले मोबाईल फोन चोरी केलेले असल्याचे आम्हाला कळले. त्यावरून आम्ही ते पोलीस स्टेशनला जमा केले. त्यानंतर पोलीसांनी माझी एका कगदावर सही घेतली. देवेश लोखंडेकडे सदर मोबाईल कसे आले, याबाबत मला माहिती नाही. सदर घटनेच्या अनुषंगाने माझेकडे चौकशी केली होती व माझे बयाण नोंदवले होते. मी देवेश लोखंडेला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर नाही. (सदर आरोपी विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे दोषारोप पत्रावरुन दिसून येते.)

**साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी**

**<u>त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.</u>**

०२.          हे म्हणणे खरे आहे की, मी, विजय निळगुणकर, देवेश लोखंडे व राजेश कापरे आंबेवाडी येथील रहीवाशी आहोत, आम्ही एकमेकांना ओळखतो, आम्ही धरणावर जाउन एकत्र जेवण करायचो. हे मला माहिती नाही की, देवेश लोखंडे व राजेश रामभाउ कापरे हे कोलाड येथील रेल्वे पुलावर उभे राहुन ट्रेन मधील प्रवाशाचे हातातील मोबाईल फोन काठी मारुन पाडायचे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, देवेश लोखंडेने मला व दिपक निळगुणकर याला मोबाईल फोन विक्री केले त्यावेळी ते चोरी असल्याचे आम्हाला माहिती होते. हे म्हणणे खरे नाही की, देवेश लोखंडे व राजेश रामभाउ कापरे यांना वाचवण्याकरीता मी  खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एन.जी.देशमुख यांनी नाकारला.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.11.08 15:10:39 +0530

(एस. एस. महाले)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.

स्थळ : रोहा.
दि.०८.११.२०२४.